पुढारी

कोल्हापूर, शनिवार २५ जानेवारी २०२०

'विवेकानंद'मध्ये रक्तदान शिबिरास प्रतिसाद

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : विवेकानंद महाविद्यालयात एन. सी. सी., एन. एस. एस. विभाग आणि छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयाची विभागीय पतपेढी (सीपीआर) यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर झाले. शिबिरात विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले. ७६ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी स्वागत केले. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. डी. बी. पाटील, प्रा. किरण पाटील, कला व डॉ. श्रुती जोशी उपस्थित होते.

तरुण भारत शनिवार, २५ जानेवारी २०२०

प्रश्नमंजुषा महाअंतिम फेरीच्या विजेत्यांचा गौरव

अरुण नरके फौंडेशन, कोल्हापूर आकाशवाणीतर्फे आयोजन : मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण

कोल्हापूर

अरुण नरके फौंडेशन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कोल्हापूर प्रस्तृत आकाशवाणी प्रश्नमंजुषा २०१९ च्या महाअंतिम सोहळ्याचे बक्षिस वितरण केशवराव भोसले नाट्यगृह येथे पार पडले.

अरुण नरके फौंडेशनचे अध्यक्ष व थायलंड सरकारचे वाणिज्य सल्लागार चेतन अरुण नरके, कोल्हापूर आकाशवाणीचे कार्यक्रम विभागप्रमुख डॉ. सुनिल गायकवाड, आयकर उपायुक्त वैभव ढेरे, राज्यकर उपायुक्त वैशाली काशीद, सांगलीचे आयकर उपायुक्त महेश लोंढे, एसबीआयचे क्षेत्रिय प्रबंधक प्रदीप देव, मुख्याधिकारी हुपरी नगरपलिका स्नेहलता ढेरे, नायब तहसिलदार मनिषा लोंढे, स्निग्धा नरके, लीना नरके आदींच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कोल्हापूर : प्रश्नमंजूषा महाअंतिम फेरीतील प्रथम क्रमांकाचे कोतोली कॉलेजचे विद्यार्थी रोहित चौगले व विजया रेडेकर, सोबत योगिराज बच्चे, डॉ. सुनील गायकवाड, वैशाली काशीद, चेतन नरके, शशिकांत सुतार, पांडुरंग गांजवे आदी.

प्रश्नमंजूषा महाअंतिम फेरीतील प्रथम क्रमांकाचे मानकरी रोहित चौगले व विजया रेडेकर (श्रीपतराव चौगले, कोतोली कॉलेज) हे विद्यार्थी ठरले, द्वितीय क्रमांक निखील चांदेकर व संदीप मिलके (जी. जी. व्हि. पी. ज्यूनि. कॉलेज हलकर्णी) या विद्यार्थ्यांना मिळाला तर तृतीय क्रमांक अभिषेक सावंत व शुभम सातपुते हे (यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय) या विद्यार्थ्यांस मिळाला. उत्तेजनार्थ १, २ व ३ क्रमांक अनुक्रमे विवेकानंद कॉलेज कोल्हापूरचे सायली वाळके व भगवान मनवर व न्यू कॉलेज काल्हापूरचे आकांक्षा पाटील व ऋतुजा पंढारे तसेच शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागाचे विद्यार्थी तन्मय वार व विरेन शहा यांना मिळाला. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला.

अध्यक्ष चेतन नरके यांनी अरुण नरके फौंडेशन गेल्या २५ वर्षात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा शैक्षणिक मार्गदर्शनाशिवाय विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ जपवणूक व शारीरिक तंदुरूस्तीच्या दृष्टीची दखल घेऊन आजवर करीत आलेल्या विविध उपक्रमांची माहिती विषद केली. कार्यक्रमाचे नियोजन आकाशवाणी कोल्हापूरचे माहिती प्रसारण अधिकारी योगीराज बच्चे व अरूण नरके फौंडेशनचे विकास अधिकारी शशिकांत सुतार यांनी केले.